# प्रकरण – ८ : भारतातील दारिद्र्य



आकृती ८.१ दारिद्र्य

## प्रस्तावना :

दारिद्र्य ही भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक प्रमुख आव्हान असून आर्थिक व सामाजिक घटकांशी निगडित आहे. काही व्यक्ती किंवा समूहाला समाजापासून वंचित करणारा घटक म्हणून दारिद्र्याकडे पाहिले जाते. मूलभूत गरजांपासून वंचित राहणे किंवा उपलब्ध संधी नाकारणे यामुळे समाजातील काही व्यक्ती किंवा समूह मुख्य प्रवाहापासून दूर जातात.

आकृती ८.१ ही दारिद्र्य या संकल्पनेची माहिती देते.

भारतातील दारिद्र्याला दीर्घ इतिहास आहे. ब्रिटिश काळात हस्त व कुटिरोद्योगांचा ऱ्हास, साधन सामग्रीचे आर्थिक निःसारण, दडपशाहीचे आर्थिक धोरण, सातत्याने पडणारे दुष्काळ इत्यादी कारणांमुळे भारतीय लोकसंख्येचा मोठा भाग दारिद्र्यात जीवन जगत होता.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमावर भारत सरकारने भर दिला आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी भारत सरकारने आर्थिक नियोजन, आर्थिक सुधारणा, गरीबी हटाओ यांसारखे दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम राबविले आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणावर दारिद्र्य कमी होण्यास मदत झाली आहे.

## दारिद्र्याचा अर्थ :

पारंपरिक अर्थानुसार दारिद्र्य म्हणजे समाजातील व्यक्ती पुरेशा उत्पन्नाअभावी अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाही अशी स्थिती होय.

## बहुआयामी दारिद्र्य :

दारिद्र्याची पारंपरिक संकल्पना केवळ मूलभूत गरजांशी निगडित होती, परंतु आधुनिक युगात दारिद्र्याच्या संकल्पनेची व्याप्ती वाढली. म्हणून बहुआयामी दारिद्र्याची संकल्पना उदयास आली.

बहुआयामी दारिद्र्य म्हणजे भौतिक व अभौतिक परिमाणांपासून वंचित राहणे होय. भौतिक परिमाणाचा संबंध अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, वीज, रस्ते बांधणी, पिण्याच्या शुद्ध पाण्याची उपलब्धता यांच्याशी संबंधित आहे. तसेच अभौतिक परिमाणांचा संबंध समाजातील विविध भेदाभेदाशी संबंधित आहे.

### तुम्हांला माहीत हवं :

**प्रा. अमर्त्य सेन** यांच्या मते, ''दारिद्र्य म्हणजे केवळ पैसा कमी असणे नव्हे तर मानवी जीवनात अनार्थिक क्षमतेचा अभाव असणे होय. या क्षमतांचा संबंध आर्थिक, सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याशी असतो. पौष्टीक व पुरेसे अन्न, आरोग्याची सुविधा, शैक्षणिक सुविधा, राजकीय व नागरी स्वातंत्र्य इत्यादींच्या कमतरतेचा संबंध दारिद्र्याशी येतो.

### तुम्हांला माहीत आहे का ?



प्रा. अमर्त्य सेन

भारतीय अर्थतज्ज्ञ व भारतरत्न पुरस्कार सन्मानित प्रा. अमर्त्य सेन यांना १९९८ मध्ये कल्याणकारी अर्थशास्त्र, सामाजिक निवडीचे सिद्धांत, समाजातील अतिदुर्बल घटकांच्या समस्यांबाबत रुची यांसारख्या योगदानाबद्दल अर्थशास्त्राचा 'नोबेल स्मृती पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यांच्या 'Poverty and Famines': An

Essay on Entitlement and Deprivation (१९८१): या पुस्तकात आर्थिक दुर्बल घटकांच्या वेदनांचा विचार तर आहेच, त्याचबरोबर त्यांच्या उत्पन्न वाढीबाबतचे विचार मांडले आहेत. तसेच आर्थिक वृद्धींसाठी सार्वजनिक आरोग्य व शिक्षणातील सुधारणांसारख्या सामाजिक सुधारणांवर भाष्य केले आहे.

**सांगा पाहू :**

- भारताच्या अर्थव्यवस्थेची विभागणी ग्रामीण व शहरी भागांमध्ये जाणवते.
- देशात उत्पन्न आणि संपत्तीचे न्याय्य वितरण आहे.
- सर्व नागरिकांना समान शिक्षण, आरोग्य, ऊर्जा व पिण्याचे पाणी मिळते.
- देशामध्ये भूक, उपासमार व कुपोषण इत्यादी दिसून येत नाही.
- देशामध्ये स्वच्छतेच्या सुविधांचा अभाव आहे.
- सर्व राज्यांमध्ये दारिद्र्याचे प्रमाण समान आहे.

## दारिद्र्याच्या संकल्पना :

भारतातील दारिद्र्य हे बहुआयामी आहे. भारतात दारिद्र्याच्या निरपेक्ष दारिद्र्य व सापेक्ष दारिद्र्य अशा प्रमुख संकल्पना आहेत.

**अ) निरपेक्ष दारिद्र्य :** निरपेक्ष दारिद्र्य हे किमान उपभोगाच्या गरजांनुसार मोजले जाते. नियोजन आयोगानुसार ग्रामीण क्षेत्रामध्ये दररोज प्रति व्यक्ती उष्मांकाचे प्रमाण २४०० उष्मांक असून, शहरी क्षेत्रामध्ये २१०० उष्मांक इतके आहे. प्रत्येक व्यक्तीला सरासरी २२५० उष्मांकाची गरज असते.

किमान उत्पन्नाच्या अभावामुळे अन्नामधून उष्मांकाची समाधानकारक अशी पातळी प्राप्त न झाल्यामुळे निरपेक्ष दारिद्र्य वाढते. बहुतांशी प्रमाणात हे दारिद्र्य जगातील विकसनशील देशांमध्ये आढळून येते. परिणामकारक दारिद्र्य उपाययोजनेद्वारे निरपेक्ष दारिद्र्याचे निर्मूलन होऊ शकते.

**शोधा पाहू.**
निरपेक्ष दारिद्र्य असलेल्या ५ देशांची नावे जागतिक बँकेच्या अद्ययावत अहवालातून शोधा.

**ब) सापेक्ष दारिद्र्य :** सापेक्ष दारिद्र्याची संकल्पना स्पष्ट करणे अवघड आहे.

विविध राहाणीमानांच्या दर्जांची तुलना केल्यानंतर सापेक्ष दारिद्र्याची कल्पना येते. या दारिद्र्याचा अभ्यास उत्पन्न पातळी, संपत्ती, उपभोग खर्च, आर्थिक निष्क्रियता (बेरोजगारी, वृद्धत्व इत्यादी) यांच्या परस्पर तुलनेमधून केला जातो. सापेक्ष दारिद्र्य हे जगातील सर्व देशांमध्ये आढळून येते.

सापेक्ष दारिद्र्य पूर्णपणे निर्मूलन करता येत नाही. योग्य धोरण व उपाययोजनांमुळे सापेक्ष दारिद्र्याचे निर्मूलन काही प्रमाणात होऊ शकते.

## दारिद्र्यरेषा :

दारिद्र्यरेषा ही अशी काल्पनिक रेषा आहे जी गरीब व गरीबेतर यांमध्ये वर्गीकरण करते. ती प्रत्येक व्यक्तीच्या दैनंदिन खर्चाशी निगडित असते. विविध समित्या आणि अभ्यासगटांनी दारिद्र्यरेषेची संकल्पना विविध प्रकारे स्पष्ट केली आहे.

निती आयोगाने दारिद्र्य निर्मूलनासाठी नेमलेल्या कार्यगटाच्या व्याख्येनुसार 'सामाजिकदृष्ट्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व सेवा खरेदी करण्याकरिता जो खर्च येतो त्या प्रारंभिक खर्चाच्या पातळीस दारिद्र्यरेषा म्हणतात'.

दारिद्र्यरेषेचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे :

१) दारिद्र्यरेषेच्या वर (APL), दारिद्र्यरेषेच्या खाली (BPL) असणारी लोकसंख्या ठरविणे.

२) कुटुंबाच्या उपभोग खर्चावरून दारिद्र्याची ओळख पटविणे.

३) वेळोवेळी दारिद्र्याचा मागोवा घेऊन प्रदेशांची तुलना करणे.

४) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमासाठी आवश्यक खर्चाचा अंदाज बांधणे.

दारिद्र्यरेषा ही प्रत्येक राष्ट्रांनुसार बदलते. जागतिक बँकेच्या अहवालानुसार दारिद्र्यरेषा ही २०११ च्या

किमतीनुसार दरडोई दर दिवशी $१.९० इतकी क्रयशक्तीच्या समानतेवर आधारित आहे. क्रयशक्तीच्या (PPP) आधारानुसार भारतातील २१.२% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आहे.

**सांगा पाहू :**

खाली दिलेल्या उत्पन्न मनोऱ्यात व्यक्तींचे उत्पन्नानुसार वर्गीकरण करा.

१) कंत्राटी कामगार

२) दुकानातील विक्रेता

३) बहुराष्ट्रीय कंपनीमधील मुख्याधिकारी (CEO)

४) कंपनीमधील विशेषाधिकारी




**उत्पन्न मनोरा**

## दारिद्र्याचे प्रकार :

**१) ग्रामीण दारिद्र्य :** ग्रामीण भागातील विशिष्ट क्षेत्रातील लोकांना मूळ गरजांपासून वंचित राहणे याला ग्रामीण दारिद्र्य असे म्हणतात. हे दारिद्र्य सीमांत व अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, कंत्राटी कामगार, इत्यादींमध्ये दिसून येते. शेतीतील कमी उत्पादकता, दुष्काळ, निकृष्ट ग्रामीण पायाभूत सुविधा, पर्यायी रोजगाराची कमतरता, ग्रामीण कर्जबाजारीपणा, निरक्षरता इत्यादींमुळे ग्रामीण दारिद्र्यात वाढ झाली आहे.


**२) शहरी दारिद्र्य :** शहरी भागातील विशिष्ट क्षेत्रातील लोकसंख्येत मूळ गरजांची कमतरता असते त्यास शहरी दारिद्र्य म्हणतात. शहरी दारिद्र्य मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील लोकांचे झालेले वाढते स्थलांतर, न परवडणारी घरे, निरक्षरता, मंद गतीने औद्योगिक वृद्धी व पायाभूत सुविधांची कमतरता या कारणांमुळे वाढते आहे. शहरी दारिद्र्यामुळे झोपडपट्टी वाढ व अनौपचारिक क्षेत्रात वाढ होते तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो.

**शोधा पाहू :**

अनौपचारिक क्षेत्राबद्दलची माहिती गोळा करा व तुमच्या निरीक्षणानुसार काही उपक्रम नमूद करा.

**तुम्हांला माहीत आहे का?**

दारिद्र्यरेषेच्या वर राहण्यासाठी खालील बाबी आवश्यक आहेत




**हे करून पहा :**

१) दर महिन्याला तुमच्या घरात खरेदी केल्या जाणाऱ्या खाद्य आणि खाद्येतर पदार्थांची यादी तयार करा.

२) तुमच्या कुटुंबात चालू किमतीनुसार दरमहा केला जाणारा एकूण उपभोग खर्च दाखवा.

३) कुटुंबाचा दरमहा यानुसार खर्च किती ते सांगा.

## भारतातील दारिद्र्याचा विस्तार :

एकूण लोकसंख्येतील दारिद्र्याचे प्रमाण हे दारिद्र्य गुणोत्तराने मोजले जाते. त्यावरून दारिद्र्याचा विस्तार निश्चित केला जातो. भारतातील दारिद्र्य विस्ताराचा अभ्यास करण्यासाठी वैयक्तिक स्तरावर अर्थशास्त्रज्ञांनी, संशोधन संस्थांनी योगदान दिले आहे. १९६२ पासून नियोजन आयोगाने विविध काम करणारे कार्यक्षम कार्यगट, तज्ज्ञ समिती भारतातील दारिद्र्याच्या मोजणीसाठी नेमल्या आहेत.

## दारिद्र्याचा अंदाज

पूर्वीची दारिद्र्यरेषा ही उष्मांकाच्या उपभोगावर अवलंबून होती. त्यात इतर वस्तूंच्या उपभोगाचा समावेश नव्हता. भारत

सरकारने वेळोवेळी दारिद्र्यरेषा मोजण्यासाठी वेगवेगळ्या समित्यांची नियुक्ती केली. डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली २०१२ साली तज्ज्ञांचा एक गट नेमला होता. या गटाने २०१४ मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार ग्रामीण व नागरी भागाकरिता दारिद्र्यरेषा निश्चित केली ती पुढीलप्रमाणे :

तक्ता क्र. ८.१ मध्ये रंगराजन गटाच्या अहवालानुसार दारिद्र्याचा अंदाज दर्शविला आहे.

**दारिद्र्याचा दर (२०११-१२)**

| दारिद्र्यरेषा (उपभोग खर्च रुपयात) | | दारिद्र्य गुणोत्तर(%) | | |
|---|---|---|---|---|
| **ग्रामीण** | **शहर** | **ग्रामीण** | **शहर** | **एकूण** |
| रू.९७२/- प्रति महिना रू.३२/- प्रति दिवस प्रति व्यक्ती | रू.१४०७/- प्रति महिना रू.४७/- प्रति दिवस प्रति व्यक्ती | ३०.९% | २६.४% | २९.५% |

**तक्ता क्र. ८.१**

**स्त्रोत :** भारत सरकार, नियोजन आयोग अहवाल (जून २०१४)

**राज्यनिहाय दारिद्र्याची टक्केवारी**

| राज्य | दारिद्र्याचा दर (२०११-१२) टक्केवारी | राज्य | दारिद्र्याचा दर (२०११-१२) टक्केवारी |
|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | ९.२० | केरळ | ७.१ |
| आसाम | ३१.९ | मध्यप्रदेश | ३१.७ |
| बिहार | ३३.७ | महाराष्ट्र | १७.४ |
| छत्तीसगड | ३९.९ | ओडिसा | ३२.६ |
| गुजरात | १६.६ | पंजाब | ८.३ |
| हरियाणा | ११.२ | राजस्थान | १४.७ |
| हिमाचल प्रदेश | ८.१ | तामिळनाडू | ११.३ |
| जम्मू आणि काश्मीर | १०.४ | उत्तरप्रदेश | २९.४ |
| झारखंड | ३६.९ | उत्तराखंड | ११.३ |
| कर्नाटक | २०.९ | पश्चिम बंगाल | १९.९ |

**तक्ता क्र.८.२** **स्त्रोत :** आर्थिक पाहणी अहवाल २०१७-१८

**शोधा पाहू :**

वरील माहितीच्या आधारे तिसरे चतुर्थक ($Q_३$) व दहावे शतमक ($P_{१०}$) काढा व त्यानुसार राज्यांची नावे लिहा.

**दारिद्र्याची कारणे :** भारतातील दारिद्र्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) **लोकसंख्येचा विस्फोट :** जलदगतीने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या मानाने गरजा भागवण्यासाठी असणाऱ्या साधनसंपत्तीचे वाटप असमान आहे, त्यामुळे मुख्य गरजा पूर्ण न झाल्याने दारिद्र्याचा विस्तार झाला आहे.

२) **आर्थिक वृद्धीचा मंद वेग :** शेती व औद्योगिक क्षेत्रातील मंद गतीने होणारी वृद्धी आणि राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नातील वृद्धी दर सुसंगत नाही. बऱ्याच राज्यांत सरासरी राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा दरडोई उत्पन्न कमी आहे. यामुळे दारिद्र्य निर्माण होऊन लोकांच्या राहणीमानाचा दर्जा खालावलेला आहे.

३) **बेरोजगारी व अर्ध बेरोजगारी :** ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्याचे प्रमाण वाढण्याचे कारण बेरोजगारी व अर्ध बेरोजगारी आहे.

४) **आर्थिक विषमता :** मोठ्या प्रमाणातील आर्थिक विषमतेमुळे दारिद्र्याची व्याप्ती वाढली आहे. उदा. उत्पन्न, मालमत्ता, उपभोगखर्च, कर्जसुविधा, शेतजमिनीचे वाटप इत्यादींमध्ये विषमता.


५) **पायाभूत सुविधांची दुर्लभता :** क्रयशक्तीच्या अभावामुळे ऊर्जा, वाहतूक, संदेशवहन, आरोग्य व शिक्षण इत्यादी पायाभूत सुविधा वापरता येत नाहीत. त्यामुळे दरिद्री अजून दरिद्री होत आहेत.

६) **चलनवाढ :** चलनवाढ म्हणजे सातत्याने जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत होणारी वाढ होय. उदा. खाद्य पदार्थ. अन्नधान्याची वाढती मागणी आणि कमी पुरवठ्यामुळे किमतीत प्रचंड वाढ होते. त्यामुळे क्रय शक्ती कमी होऊन गरीब आणखी गरीब होतात. अन्न संकटामुळे लोकांमध्ये उपासमार, कुपोषण इत्यादींत वाढ झाली आहे.

७) **प्रादेशिक असंतुलन :** प्रादेशिक असंतुलन हे दारिद्र्याचे एक कारण आहे. ओरिसा, मध्यप्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश व आसाम ही राज्ये आर्थिक विकासामध्ये मागासलेली असून त्यांचे दारिद्र्याचे गुणोत्तर जास्त आहे.

८) **दारिद्र्याचे दुष्टचक्र :** ही संकल्पना प्रा. रॅग्नर नर्क्स यांनी मांडली आहे. अनेक भारतीय दारिद्र्याच्या दुष्टचक्रात

अडकले असून परिणामी राष्ट्रीय उत्पन्नात घट, दरडोई उत्पन्न कमी, कमी उपभोग, कमी भांडवल निर्मिती, कमी बचत, कमी उत्पादन व रोजगारीत घट झाली आहे. आकृती क्र.८.२ ही दारिद्र्याचे दुष्टचक्र स्पष्ट करते.




आकृती ८.२ दारिद्र्याचे दुष्टचक्र

**९) इतर घटक :**

- नैसर्गिक आपत्तींची पुनरावृत्ती
- जात, धर्म, वर्ण व लिंगभेदभाव
- प्रशासकीय अकार्यक्षमता व भ्रष्टाचार
- सार्वजनिक वितरण पद्धतीतील अडथळे

**तुम्हांला माहीत हवं :**

**दारिद्र्याचे परिणाम**

- देशाची आर्थिक प्रगती दारिद्र्यामुळे लांबणीवर पडते.
- राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न कमी होते.
- राहणीमान खालावलेले असते.
- बचत, गुंतवणूक व भांडवल निर्मिती कमी होते.
- आर्थिक शक्ती तीव्र होते व संधीची असमानता निर्माण होते.
- श्रीमंत व गरीब वर्गात मतभेद होतात.
- दारिद्र्यामुळे समाज व राष्ट्रविरोधी कारवाया यामध्ये वाढ होते.
- कल्याणकारी कार्यक्रमावरील अनुदान वाढीमुळे सरकारी खर्चात वाढ झाल्याने साधनसपंत्तीचे असमान वाटप झाले आहे.
- दारिद्र्यामुळे आर्थिक हालाखीत व कष्टप्रद जीवन जगावे लागते.
- दारिद्र्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो.

**तुम्हांला माहीत हवे :**




संयुक्त राष्ट्र 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स' चा अहवाल सप्टेंबर २०१५ रोजी आंतरराष्ट्रीय समुदायाने स्वीकारला असून त्यात पूर्णपणे सामाजिक, आर्थिक व पर्यावरणविषयक परिणामांचा समावेश केला आहे. SDGs मध्ये वैश्विक करार करून दारिद्र्याचे स्वरूप व परिणाम पूर्णपणे संपवणे याचा समावेश केला आहे. त्यामध्ये १७ SDGs असून १६९ ध्येय २०३० पर्यंत संपादित करणे असे आहे. SDGs ना आकार देण्यात भारताची एक मुख्य भूमिका आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या दृष्टीने भारताला आदराचे स्थान असल्यामुळे २०३० या वर्षापर्यंत दारिद्र्य निर्मूलनासाठी शाश्वत विकासाचे ध्येय कटिबद्ध मानले गेले आहे.

**दारिद्र्य निर्मूलनाचे सामान्य उपाय :** दारिद्र्य निर्मूलनासाठी धोरणामध्ये खालील उपाय केले आहेत.

**१) लोकसंख्येवर नियंत्रण :** कुटुंब कल्याण कार्यक्रम व लोकसंख्येचे धोरण यामुळे वेळोवेळी लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवले आहे.

**२) शेती :** शेतीसाठी लागणारी आदाने विकत घेण्यासाठी शेतकऱ्यांना स्वस्त दरात कृषी सुविधा पुरविल्या जातात. सरकारने शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्न मिळावे म्हणून काही पिकांसाठी किमान आधारभूत किमती जाहीर केल्या आहेत.

३) **ग्रामीण कामे :** ग्रामीण भागातील रस्त्यांची बांधणी, लघु जलसिंचन सुविधा निर्मिती, ग्रामीण विद्युतीकरण इत्यादी कामाद्वारे गरिबांना रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे.

४) **ग्रामीण औद्योगीकरण :** ग्रामीण भागात रोजगार पुरविण्यासाठी लघुउद्योग व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन दिले आहे.

५) **किमान वेतन :** १९४८ मध्ये किमान वेतन कायदा संमत झाला. त्याअंतर्गत मजुरांना न्याय्य मोबदला देण्याची तरतूद करण्यात आली आणि त्यात वेळोवेळी बदल करण्यात आले.

६) **सार्वजनिक वितरण व्यवस्था :** सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे गरिबांना सवलतीच्या दराने शिधा वाटप केंद्राद्वारे अन्नधान्य वितरण व अन्नसुरक्षा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे गरीब कुटुंबामध्ये अन्नधान्याची निश्चिती झाली आहे.

७) **बँकांचे राष्ट्रीयीकरण :** आर्थिक अंतर्भाव करण्याच्या हेतूने गरीब लोकांना कमी व्याजदरात पतसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १९६९ व १९८० साली बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

८) **प्रगतिशील कर धोरण :** उत्पन्न विषमता कमी करण्यासाठी प्रगतिशील कर पद्धत अंमलात आली.

९) **शिक्षण :** प्राथमिक शिक्षण हे सगळ्यांना मोफत व सक्तीचे केले आहे. विद्यार्थ्यांची पटनोंदणी वाढविण्यासाठी शाळेमध्ये पेयजल, स्वच्छतागृह सुविधा, मुलींसाठी मोफत शिक्षण, माध्यान्ह भोजन योजना हे कार्यक्रम सुरू केले आहेत.

१०) **स्वस्त गृहनिर्माण योजना :** ग्रामीण व नागरी भागातील गरिबांसाठी पुनर्वसन कार्यक्रम व स्वस्त दरात घरे देण्याची सुविधा पुरविली आहे.

११) **आरोग्याच्या सुविधा :** गरिबांना सवलतीच्या दरात वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे, सरकारी दवाखाने यांची स्थापना करण्यात आली आहे.

१२) **कौशल्य विकास आणि स्वयंरोजगार :** भारतात रोजगार निर्मितीसाठी कौशल्य विकास हा महत्त्वाचा दृष्टिकोन मानला जातो. यासाठी कौशल्यावर आधारित प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या संधीमुळे लोक उद्योजकता किंवा स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहीत होतील.

**हे करून बघा :**

अन्नसुरक्षेच्या खात्रीसाठी महाराष्ट्र सरकारने तीन रंगांचे रेशनकार्ड सुरू केले आहे. अन्नपुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र सरकार यांच्यानुसार उत्पन्न पातळीवर आधारित रेशनकार्डचा रंग ओळखा.

**पांढरे** **केशरी** **पिवळे**




**हे करून बघा :**

खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमासोबत जोड्या लावा. अन्न सुरक्षा, रोजगार व स्वयंरोजगार, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, आर्थिक समावेशन, गृहनिर्माण

- रोजगार हमी योजना
- स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना
- जन धन योजना
- स्वच्छ भारत अभियान
- सर्व शिक्षा अभियान
- अंत्योदय अन्न योजना
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
- प्रधानमंत्री आवास योजना
- राष्ट्रीय आरोग्य मिशन

**तुम्हांला माहीत आहे का?**

१७ ऑक्टोबर हा जागतिक दारिद्र्य निर्मूलन दिवस मानला जातो.

दारिद्र्यामुळे आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो. दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने सुरू केलेल्या कार्यक्रमांवर वेळोवेळी देखरेख करणे गरजेचे असते. त्यांतील त्रुटी व प्रगती कमी करणाऱ्या घटकांवर परिणामकारक प्रभावी अंमलबजावणी करायला हवी

## स्वाध्याय

### प्र. १. विधान आणि तर्क प्रश्न :

**१) विधान 'अ' :** कृषी उत्पादनातील वाढीबरोबर दारिद्र्याच्या पातळीत घट होते.

**तर्क विधान 'ब' :** हवामानाच्या स्थितीत मोठ्या प्रमाणावर चढ-उतार झाल्यामुळे कृषी उत्पन्नात घट झाली आहे.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधान ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**२) विधान 'अ' :** शहरी दारिद्र्य मुख्यत्वे ग्रामीण लोकांमध्ये स्थलांतरणाच्या प्रभावावर परिणाम करणारे आहे.

**तर्क विधान 'ब' :** ग्रामीण लोक हे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, पर्यायी नोकऱ्यांची कमतरता यामुळे स्थलांतरित झाले.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधान ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**३) विधान 'अ' :** जगातील सर्व देशांमध्ये सापेक्ष दारिद्र्य आढळून येते.

**विधान तर्क 'ब' :** सापेक्ष दारिद्र्य मोजण्यासाठी तुलना करण्यासाठी उत्पन्न पातळीतील फरक हा फक्त एकमेव निकष आहे.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**४) विधान 'अ' :** दारिद्र्यात पैशांच्या कमतरतेबरोबरच कार्यक्षमतेचीही कमतरता आढळून येते.

**विधान तर्क 'ब'** : भूकेचे समाधान न होणे, आरोग्य सेवेची कमतरता, राजकीय स्वातंत्र्य नाकारणे याचे रूपांतर दारिद्र्यामध्ये होते.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**५) विधान 'अ' :** अन्नसुरक्षा, गरिबांना पतपुरवठा सुविधा, सामाजिक सुरक्षिततेची हमी देणे.

**विधान तर्क 'ब' :** प्रशासकीय व्यवस्थेतील गळती दारिद्र्य कायम राखते.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

### प्र. २. विसंगत शब्द ओळखा :

१) रेशनकार्डाचे रंग - पांढरे, हिरवे, केशरी, पिवळे
२) जास्त दारिद्र्य गुणोत्तर - छत्तीसगड, झारखंड, बिहार, केरळ
३) उष्मांक - २४००, १८००, २१००, २२५०

### प्र.३. अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सांगा :

१) समाजातील काही विशिष्ट लोकांना संधी नाकारणे....
२) दारिद्र्याच्या संकल्पनेत भौतिक आणि अभौतिक परिमाणे समाविष्ट केले जातात.
३) लोकांच्या राहणीमानाच्या सापेक्ष दर्जाच्या आधारावर दारिद्र्याचा अभ्यास केला जातो....
४) दारिद्र्याचे पूर्णतः निर्मूलन करता येत नाही.
५) सामाजिकदृष्ट्या स्वीकारल्या जाणाऱ्या पातळीवर मूलभूत मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक खर्चाची गरज भासते.

### प्र.४. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून संकल्पना स्पष्ट करा :

१) बबनची मुलगी अत्यल्प आहारातून मिळणाऱ्या कमी उष्मांकामुळे अशक्त झाली व तिला रुग्णालयात दाखल केले.
२) धनाजीराव मोठे जमिनदार आहेत परंतु त्यांचे वार्षिक उत्पन्न उद्योजक रावबहादूरांपेक्षा कमी आहे.
३) उर्मिच्या कुटुंबाची अवस्था एवढी हालाखीची आहे की त्यांना अन्न, वस्त्र, निवारासारख्या गरजा ही भागवता येत नाहीत.
४) संजयच्या कुटुंबाला पिवळ्या शिधावाटप पत्रिकेद्वारे धान्य मिळते.
५) राज्यामध्ये काही भागांत भूकबळी होतात, तर काही भागांत अन्नाची नासाडी होते असे विदारक चित्र आहे.

### प्र. ५. खालील विधानाशी सहमत आहात किंवा नाहीत ते सकारण स्पष्ट करा.

१) लोकसंख्या नियंत्रण दारिद्र्य दूर करण्याचा एकमेव उपाय आहे.
२) सापेक्ष दारिद्र्य जगात सर्वत्र आढळते.
३) प्रादेशिक असंतुलन हे दारिद्र्याचे एकमेव कारण आहे.

### प्र. ६. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) भारतातील दारिद्र्याची कारणे स्पष्ट करा.
२) भारतातील दारिद्र्य निर्मूलनाचे सामान्य उपाय स्पष्ट करा.

◈◈◈